www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक **तरुणांचा बुलंद आवाज** मराठी

# युवक आधार

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : १४८ वार बुधवार दि. १२ फेब्रुवारी २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

दै. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

## जागतिक पाणथळ दिवस व कांदळवन स्वच्छता अभियान संपन्न

**दैनिक युवक आधार**
**कॉलेजकट्टा/आरती सुरवसे**

कांदळवन विभाग- दक्षिण कोकण अलिबाग - रायगड, कांदळवन प्रतिष्ठान, महाराष्ट्र, रयत शिक्षण संस्थेचे वीर वाजेकर कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय फुंडे,उरण व माझी वसुंधरा अभियान ५.० ग्रामपंचायत बोकडविरा, ग्रुप ग्रामपंचायत नवघर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पाणथळ दिवस व कांदळवन स्वच्छता अभियान आयोजित करण्यात आले होते.



कांदळवन वन परिमंडळ अधिकारी श्री. किशोर सोनवणे व त्यांचा MSF स्टाफ,कांदळवन प्रतिष्ठानच्या प्रकल्प सहयोगी साईश्वरी व विवेक जी हे तांत्रिक मार्गदर्शनासाठी तसेच वीर वाजेकर कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय चे प्रभारी प्राचार्य डॉ आमोद ठक्कर उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख चव्हाण जी डी , डॉ घोडके एस. व्ही. राज्यशास्त्र विभाग प्रमुख, रसायनशास्त्र विभागाचे वाय ए गायकवाड व डॉ सोनवले एम सी NSS चे डॉ धिंदले सी डी व विद्यार्थी निकेतन ठाकूर पर्यावरण प्रकल्प समन्वयक ग्रामपंचायत बोकडविरा व फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) चिरनेर उरण संस्थेचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. , MSF स्टाफ व उपस्थित सर्वांनी कांदळवन स्वच्छता अभियान मोहिमेत सहभाग घेतला. ग्रुप ग्रामपंचायत नवघरचे सरपंच, नितीन मढवी, उपसरपंच विश्वास तांडेल, कुंडेगाव चे अध्यक्ष प्रमोद पाटील आणि बोकडविरा गावाचे उपसरपंच ध्रुव पाटील व सदस्य मिथुन पाटील यांची विशेष उपस्थिती होती. जमा झालेला कचरा घंटागाडी मार्फत गोळा केले गेला. अशा प्रकारचे स्वच्छता अभियान कांदळवन विभागाद्वारे पुढील काळात आयोजित केले जाणार आहेत. गावागावात फिरून कांदळवन क्षेत्रांवर कचऱ्याचा नायनाट करणे व कांदळवन परिसंस्थेस असणारा संभाव्य धोका कमी करणे हे ह्या अभियान मागचा उद्देश असल्याचे वीर वाजेकर कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय चे प्रभारी प्राचार्य डॉ आमोद ठक्कर यांनी या वेळी सांगितले.

## यशवंतराव चव्हाण केंद्राचा प्रा.एल.बीं. ना "कृतज्ञता पुरस्कार"जाहीर...

### कोमसाप उरणकडून अभिनंदन अध्यक्ष,मच्छिंद्र म्हात्रे.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

यशवंतराव चव्हाण केंद्र,नवी मुंबई यांनी साहित्य सेवा आणि सामाजिक प्रबोधन यासाठी ठेवलेला " कृतज्ञता पुरस्कार " २०२५ हा रायगडभूषण प्रा.एल बी.पाटील यांना,केंद्राचे अध्यक्ष प्रमोद कर्नाड यांनी नुकताच जाहीर केला आहे. त्यामुळे त्यांचे कोकण मराठी साहित्य परिषद उरण, जाहीर अभिनंदन करीत असल्याचे अध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे यांनी आमच्या प्रतिनिधीना कळविले आहे रायगडभूषण प्रा.एल.बी.पाटील हे एक साहित्य आणि सामाजिक क्षेत्रातील चळवळखोर व्यक्तिमत्त्व आहे. ३५ पूस्तके प्रकाशित केली असून स्वरचित २३ नाटके राज्य स्पर्धेत सादर करून अनेक पारितोषिके लेखन, सादरीकरण आणि कलाकारांना प्राप्त करून दिली आहेत.



रायगड भुषण प्रा.एल.बी.पाटील

सामाजिक कार्यात,१) पतीच्या मृत्यूनंतर पत्नीचे सौभाग्यालंकार उतरवू नयेत.२) आगरी समाजातील दारू मटणाची मांडवप्रथा बंद करा ३) उरणात १९९८ मध्ये सुरू होण्यावेळीच लेडिजबार बंद करण्यात प्रमुख होते.४) २००५ सेझ विरोधात २३ गावांमध्ये कविसंमेलनातून त्यांच्या नेतृत्वाखाली जनजागृती केली.५) उरणात दर महिन्याच्या १७ तारखेला आजवर त्यांच्या मार्गदर्शनाखाली मधुबन कट्टा कोमसापने ११२ ज्येष्ठांसाठी कविसंमेलने घेतली आहेत.त्यांची साहित्य आणि सामाजिक सेवा ही नवोदितांसाठी प्रेरणादायी आहे, त्यामुळे त्यांना देण्यात येणाऱ्या तो पुरस्काराचा सन्मान आहे,असे आमच्या कोमसापला वाटते,असेही अध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे म्हणाले. हा सन्मान २२/०२/२०२५ रोजी सकाळी ९.०० वाजता स्टर्लिंग कालेज नेरूळ येथे मा.मंत्री महोदय दिलीप वळसे पाटील यांच्या शुभहस्ते केला जाणार आहे.याचवेळी ३ संस्था आणि १३ व्यक्तिमत्त्वांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

## यू अँड आय एंटरटेनमेंट प्रस्तुत मिस नवी मुंबई ब्युटी पेजंट सीझन 14 चे टॉप 13 फायनलिस्ट्स विजेतेपदासाठी सज्ज!

**दैनिक युवक आधार**
**(नवी मुंबई)** – मिस नवी मुंबई सौंदर्य स्पर्धेच्या चौदाव्या पर्वाची सविस्तर माहिती देण्याकरिता पत्रकार परिषद सोमवारी आयोजित करण्यात आली, ज्यामध्ये तेरा सौंदर्यवतींची अधिकृत घोषणा करण्यात आली. फोर पॉईंट्स बाय शेरटन, वाशी येथे ८ मार्च २०२५ रोजी संपन्न होणाऱ्या अंतिम सामन्यात हा प्रतिष्ठित किताब जिंकण्यासाठी त्या सज्ज आहेत. स्पर्धेचे आयोजन यू अँड आय एंटरटेनमेंट द्वारे केले जाते आणि यंदाच्या सर्व तेरा सौंदर्यवती आपले **पान २ वर**






**हॉटेल फोर पॉइंट्स बाय शेरेटन विषयी**
हॉटेल फोर पॉइंट्स बाय शेरेटन हा एक आंतरराष्ट्रीय दर्जाचा हॉटेल ब्रँड आहे, जो उत्कृष्ट आतिथ्यासाठी प्रसिद्ध आहे. गेल्या 8 वर्षांपासून हा ब्रँड मिस नवी मुंबई ब्युटी पेजंटशी जोडला गेला असून, स्पर्धक आणि पाहुण्यांना अविस्मरणीय अनुभव देण्याचे कार्य तो सातत्याने करीत आहे.

**यू अँड आय एंटरटेनमेंट विषयी**
यू अँड आय एंटरटेनमेंट ही एक आघाडीची एंटरटेनमेंट कंपनी आहे, जी उच्च स्तरावरील सौंदर्य स्पर्धा आणि भव्य इव्हेंट्सचे आयोजन करते. महिलांना एक प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही कंपनी इव्हेंट इंडस्ट्रीमध्ये नवे मानदंड स्थापित करत आहे.

**फ्रेंच एसेंस विषयी**
फ्रेंच एसेंस हा एक प्रीमियम परफ्युम ब्रँड आहे, जो आपल्या आकर्षक आणि अद्वितीय सुगंधांसाठी प्रसिद्ध आहे. मिस नवी मुंबईचा अधिकृत फ्रेगरन्स पार्टनर म्हणून, हा ब्रँड या प्रतिष्ठित सौंदर्य स्पर्धेत एक वेगळी ओळख निर्माण करत आहे.

## तिवसाळा आश्रम शाळेत कायदे विषयक मार्गदर्शन शिबीर

**दैनिक युवा आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनीधी - महेश पेंदोर**

वाढत्या बाल लैंगिक अत्याचाराच्या घटनेबाबत प्रतिबंधात्मक उपाय म्हणून विधी सेवा समिती,घाटंजी वतीने मा. राष्ट्रीय तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशाप्रमाणे मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, यवतमाळ एन.व्ही. न्हावकर व **पान २ वर**



## शिर्डीत सौ.निशा गांवडे यांना साई गुणगौरव समाजभूषण पुरस्कार प्रदान

**दैनिक युवक आधार**
**विकास वायाळ**
**मुबंई प्रतिनिधी**

शिर्डीत साई गुणगौरव समाजभूषण पुरस्कार. 2025.देऊन.सौ.निशा गांवडे यांचा सन्मान करण्यात आला*.ओम साई विकास प्रतिष्ठान व बी.बी.सी.फिल्म प्रोडक्शन महाराष्ट्र राज्य निर्मित साई गुणगौरव पुरस्कार 2025.हा साई च्या पावन व पवित्र भुमित शिर्डीत सौ.निशा गावंडे मॅडम अमरावती यांना देण्यात **पान २ वर**



## तळा केंद्रावर १२ वी बोर्ड परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त व शांततेत सुरू

**दैनिक युवक आधार**
**तळा वार्ताहर**

कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय तळा केंद्र क्रमांक २७४१ फेब्रुवारी - मार्च २०२५ ची बारावी बोर्ड परीक्षा शांतता, कॉपीमुक्त व भयमुक्त वातावरणात सुरू झाली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षेला आजपासून सुरुवात झाली आहे. या परीक्षेसाठी राज्यातील एकूण १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली आहे. राज्यातील ३ हजार ३७३ केंद्रावर परीक्षा होत असून परीक्षेसाठी सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आलेली आहे. परीक्षेचा निकाल १५ मे पर्यंत लावण्याचे उद्दिष्ट मंडळाने ठेवले आहे. परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी यंदा अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तळा केंद्रावर कला शाखा ६५, वाणिज्य शाखा ८६ तर विज्ञान शाखा ७० असे एकूण २२१ विद्यार्थी प्रविष्ट झाले आहेत. यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री चंद्रकांत रोडे, सचिव श्री मंगेशशेठ देशमुख, उपाध्यक्ष श्री पुरुषोत्तम मुळे, शाळा समितीचे चेअरमन श्री महेंद्रशेठ कजबजे, कार्यकारी मंडळाचे सदस्य श्री महादेव बैकर, प्राचार्य श्री दिलीप ढाकणे आदी मान्यवरांनी १२ वी च्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. तळा केंद्रावर केंद्राध्यक्ष म्हणून प्राध्यापक बोळेगावे आय बी, केंद्र उपसंचालक प्राध्यापक भुरे टी एन, स्टेशनरी सुपरवायझर श्री प्रसाद सुतार, लिपिक श्री स्वप्निल वरंडे तर शिपाई म्हणून श्रीमती के के सुतार काम पाहत आहेत. झूम अपद्वारे रायगड जिल्हाधिकारी यांना तळा केंद्रावरील परीक्षा शांतता, कॉपीमुक्त व भयमुक्त वातावरणात पोलीस बंदोबस्त व बैठे पथकांच्या उपस्थितीत पार पडत असल्याचे लाईव्ह चित्रीकरण दाखवण्यात आले. तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे कॉम्प्युटर सेंटरच्या संदिका बारटक्के व तळा येथील श्री उमेश सर यांनी कॉपी करून खाली नका घालू मान अभ्यास करून वाढवा रायगडची शान, अभ्यास करा व आत्मविश्वासाने म्हणा मी कॉपी करणार नाही, कॉपीमुक्त परीक्षा प्रगतीची नवी दिशा असे स्लोगन असलेले पोस्टर परीक्षा केंद्राच्या आवारात लावून कॉपीमुक्त परीक्षा अभियानास प्रोत्साहन दिले आहे.



## पाटोदा येथे शिवजन्मोत्सवा निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन...

### १३ फेब्रुवारी रोजी भव्य मोफत आरोग्य तपासणी, औषध उपचार व रक्तदान शिबीर

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -** शिवजन्मोत्सवा निमित्त पाटोदा येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून दिनांक- १३ फेब्रुवारी रोजी भव्य मोफत आरोग्य तपासणी, औषध उपचार व रक्तदान शिबीर आयोजित केले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन लोकनेते आमदार सुरेश(आण्णा) धस यांच्या हस्ते होणार असुन या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोकजी थोरात हे उपस्थित राहणार आहेत. या शिबीरासाठी विविध क्षेत्रातील तज्ञ डॉक्टर्स सहभागी होत आहेत. या शिबिरात हृदयरोग तज्ञ डॉ.किरण सवासे, जनरल सर्जन डॉ.अभिषेक जाधव, नेत्र तज्ञ डॉ.चंद्रकांत वाघ, अस्थीरोग तज्ञ डॉ.अभिनव जाधव, स्त्रीरोग तज्ञ डॉ.रूपाली सोळंके (जाधव), श्वसनविकार व अतिदक्षता तज्ञ डॉ.प्रशांत जाधव, त्वचारोग तज्ञ डॉ.अनिल नागरगोजे, मानसोपचार तज्ञ डॉ.अक्षय जाधव, बालरोग तज्ञ डॉ.विशाल तांगडे, स्त्रीरोग तज्ञ डॉ.पल्लवी तांदळे ( बिनवडे) सह इतर तज्ञ डॉक्टर सहभागी होत आहेत. तरी पाटोदा व परीसरातील गरजु रूग्णांनी या शिबिराचा अवश्य लाभ घ्यावा. तसेच १४ फेब्रुवारी रोजी शिवशाहीर डॉ.देवानंद माळी यांचे शिवशाहीरी कार्यक्रम होणार असून १५ फेब्रुवारी रोजी ह.भ.प.विशाल महाराज खोले यांचे किर्तन होईल. तर १६ फेब्रुवारी रोजी गणेश भोसले व कु.तेजस्विनी सावंत यांचे शिवव्याख्यान, १७ फेब्रुवारी रोजी १ली ते ५वी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन, १८ फेब्रुवारी रोजी ६वी ते १०वी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन व १९ फेब्रुवारी रोजी सकाळी १०:०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन व ११:०० वाजता रांगोळी स्पर्धा होतील. तसेच सायंकाळी ठिक-४:०० वाजता भव्य मिरवणुकीस प्रारंभ होणार आहे. मिरवणुकीचा शुभारंभ संघर्षयोध्दा मनोज दादा जरांगे पाटील व लोकनेते आमदार सुरेश(आण्णा) धस यांच्या हस्ते होईल. तरी या कार्यक्रमास सर्व शिवप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व पदाधिकारी, सदस्य यांनी केले आहे.






डॉ नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन नवीन पनवेल शाळेच्या उपमुख्याध्यापिका मानस तज्ञ डॉक्टर महानंदा निकम मॅडम सेवानिवृत्त झाल्याबद्दल पालकांकडून शाल पुष्पगुच्छ फोटो फ्रेम देऊन सत्कार करण्यात आला

# उरण-कळंबुसरे गावचा साहिल पाटील

## इंटरनॅशनल बिझनेस पदवी परीक्षेत ठरला सुवर्णपदकाचा मानकरी.

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

पुणे येथील अजिंक्य डी वाय पाटील विद्यापीठाच्या बीबीए(इंटरनॅशनल बिझनेस) 2021- 2024 च्या पदवी परीक्षेत उरण तालुक्यातील कळंबुसरे गावचा साहिल कीर्ती राजाराम पाटील यांने सुयश प्राप्त केले असून, तो प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याने पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या पदवीदान समारंभात त्याला मान्यवरांच्या हस्ते सुवर्णपदक देऊन गौरविण्यात आले आहे. तसेच विद्यापीठाचा बेस्ट स्टुडन्ट ऑफ द इयर अवॉर्डचा देखील तो मानकरी ठरला असल्याने सर्वच स्तरांतून त्यच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या पदवीदान समारंभात साहिल कीर्ती राजाराम पाटील याला सन्माननीय उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत आणि डॉ.लक्षराज सिंग मेवाड ऑफ उदयपूरयांच्या हस्ते व विद्यापीठाचे कुलपती सन्माननीय अजिंक्य डी. वाय. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत त्याला हा मानाचा व प्रतिष्ठेचा समजला जाणारा आवार्ड प्रदान करण्यात आला. ब्याचलर आ्फ बिझनेस अडमिनीस्ट्रेशन ( इंटरनॅशनल बिझनेस) या पदवी परीक्षेत अभिमानास्पद कामगिरीबद्दल तो या नेत्रदीपक यशाचा मानकरी ठरला आहे.



उरण तालुक्यातील ग्रामीण भागातील कळंबुसऱ्या सारख्या खेडे गावातील निवृत्त माध्यमिक शिक्षक राजाराम जनार्दन पाटील व कीर्ती पाटील यांचा तो सुपुत्र असून, त्याने हे नेत्रदीपक यश संपादन केले आहे. शालेय शिक्षणापासून ते महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत तो सातत्याने प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होत आला आहे. सध्या तो मुंबई येथील वेलिंगकर इन्स्टिटयूट ऑफ म्यानेजमेंट डेव्हलपमेंट अँड अँड रीसर्च,या नामांकित महाविद्यालयात एम.बी.ए.चे शिक्षण घेत आहे. आपल्या यशा बाबत साहिल म्हणतो मझा अभ्यासाचा सराव, जिद्द आणि प्रचंड आत्मविश्वास, प्राध्यापकांचे योग्य मार्गदर्शन आणि कळंबुसरे गावाचे आराध्यदैवत भगवान शिवशंकराची कृपा आणि आई-वडिलांचे आशीर्वाद यामुळे मलाहे यश प्राप्त झाले असल्याचे तो सांगतो त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून त्याच्यावरय कौतुका बरोबर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# तिवसाळा आश्रम शाळेत कायदे विषयक मार्गदर्शन शिबीर

**पान १ वरुन** मा. सचिव के.ए. नहार, यांच्या मार्गदर्शनाखाली, शुक्रवार दि१०/२/२०२५ रोजी "श्री. गजानन महाराज अनुसुचित जाती माध्यमिक आश्रम शाळा तिवसाळा ता घाटंजी येथे रॅगिंग करण्यास मनाई करणे अधिनियम,१९९९, वाहतुक नियम व लैंगिक गुन्ह्यापासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ ईत्यादि विषयावर कायदे विषयक मार्गदर्शन घेण्यात आले.शिबिरास प्रमुख मार्गदर्शक तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष,दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे न्यायाधीश मा.अतुल अ. उत्पात होते.शिबिराची सुरूवात विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत, राष्ट्रीय प्रतिज्ञा घेवून तसेच संविधान उदेशिका वाचन करून केली. तदनंतर उपस्थित शाळा मुख्याध्यापक यांनी पुष्पगुच्छ देउन न्यायाधीश यांचे विद्यार्थी तथा शाळेच्यां वतिने स्वागत केले. न्यायाधीश यांनी मार्गदर्शन करतांना विद्यार्थ्यांना संविधान तसेच मूलभूत कर्तव्याचे महत्व पटवून देत उत्तम विद्यार्थी होण्याकरीता राष्ट्रीय प्रतिज्ञेनुसार सर्व भारतियासी बंधुभाव ठेवणे, सर्व वडिलधाऱ्या माणसांचा मान ठेवणे, सर्वांशी सौजन्याने वागणे आवश्यक असल्याचे संगितले. विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत गुन्हा म्हणजे काय? हे समजावून सांगितले तसेच समाजात गुन्हा घडत असल्यास त्याची माहिती तात्काळ पोलीस हेल्पलाईन क्रमांकावर द्यावी.विद्यार्थ्यांना चांगला व वाईट स्पर्श यातील फरक प्रात्यक्षीत करुन दाखवला. विद्यार्थ्यां पैकी मुलगा/ मुलगी यांना कोणी वाईट स्पर्श केल्यास स्वसंरक्षण अधिकाराचा वापर करून त्याचा विरोध करणे तसेच तात्काळ पालकांना व शिक्षकांना त्याबदल माहिती सांगणेबाबत मार्गदर्शन केले. आत्म स्वसंरक्षण व बचावाकरीता संतुलीत आहार घेवून स्वताःचे शरीर सुदृढ बनविण्यासाठी व्यायामाचे महत्व पटवून देत मोबाईलचा वापर करतेवेळी शासनाने बंदी घातलेल्या, समाजास घातक संकेत स्थळावरिल छायाचित्र,चित्रफीत पाहून त्यांना प्रसिध्द केल्यास गुन्हा होऊ शकतो.त्यामुळे भवितव्य धोक्यात येते याची जाणीव करून दिली. या शिबीर प्रसंगी जि.प शाळा तिवासाळा चे मु. अ आडे सर, वाय.आर.राठोड, एस.डी. नगराळे,मनोज उत्तरवार, डी.राठोड, एन.ए बोन्डे, ए.एस डी बोढे, पिंटू भडंगे, प्रेम राठोड, सुरज पवार, झाडे सह ईतर शाळा कर्मचारी, विद्यार्थी, शिक्षक, तथा न्यायालयीन कर्मचारी बहूसंखेनी उपस्थितीत होते.

# यू अँड आय एंटरटेनमेंट प्रस्तुत मिस नवी मुंबई ब्युटी पेजंट सीझन 14 चे टॉप 13 फायनलिस्ट्स विजेतेपदासाठी सज्ज!

**पान १ वरुन** सौंदर्य, प्रतिभा आणि आत्मविश्वासाच्या जोरावर या स्पर्धेत भाग घेत आहेत. शेकडोच्या वर प्राथमिक फेरीत सहभाग झालेल्या स्पर्धकांपैकी पुढील तेरा स्पर्धक अंतिम फेरीत पोहोचल्या आहे. त्या पुढील प्रमाणे आहेत - अदिती तांबे, अवनी आचार्य, भावना सिंग, काजल पवार, करिश्मा कदम, काव्या बाली, निशिता ताहिलरामानी, रुपवर्धिनी सस्ते, साक्षी चुरी, सारा इम्तियाज, शुभ्रिधी पटेरिया, विनीत कौर आणि वृषाली भगत.

या प्रतिभावान स्पर्धक पारंपरिक वेशभूषा, वेस्टर्न वेअर आणि ईव्हनिंग गाऊन राऊंडमध्ये आपली चमक दाखवतील आणि मिस नवी मुंबई २०२५ चे विजेतेपद मिळवण्यासाठी प्रयत्नशील असतील.

**हॉटेल फोर पॉइंट्स बाय शेरेटन –या सौंदर्य स्पर्धेचे मुख्य प्रायोजक असून**

हॉटेल फोर पॉइंट्स बाय शेरेटन गेल्या ८ वर्षांपासून या स्पर्धेशी जोडले आहे, यंदाही अधिकृत स्थळ प्रायोजक म्हणून सहकार्य करत आहे. हॉटेल मॅनेजर श्री. किरण मुनिराज यांनी या सहकार्याबद्दल आनंद व्यक्त करत सांगितले, "मिस नवी मुंबई ब्युटी पेजंटला समर्थन देणे ही आमच्यासाठी मोठी आनंदाची गोष्ट आहे. आम्ही गेल्या अनेक वर्षांपासून या प्रतिष्ठित स्पर्धेचा भाग आहोत आणि महिलादिनाच्या निमित्ताने होणाऱ्या ग्रँड फिनालेसाठी आम्ही उत्सुक आहोत."

**फ्रेंच एसेंस – अधिकृत फ्रेगरन्स पार्टनर**

यंदाच्या स्पर्धेला फ्रेंच एसेंस हा प्रीमियम परफ्युम ब्रँड 'पावर्ड बाय' म्हणून सहकार्य करत आहे. आपल्या अनोख्या आणि मोहक सुगंधांनी हा ब्रँड मिस नवी मुंबई स्पर्धेच्या भव्यतेत अधिक रंगत आणत आहे.

या भव्य सौंदर्य स्पर्धेचे आयोजक यू अँड आय एंटरटेनमेंट चे संचालक हरमीत सिंह आणि मनमीत सिंह यांनी यंदाच्या स्पर्धेबद्दल उत्साह व्यक्त करत सांगितले,"आम्ही यावर्षीच्या गुणी आणि आत्मविश्वासाने भरलेल्या फायनलिस्ट्सना सादर करताना खूप आनंदी आहोत. स्पर्धा अत्यंत रोमांचक असणार आहे आणि आम्हाला फिनालेमध्ये या स्पर्धकांनी आपली प्रतिभा आणि व्यक्तिमत्त्व सादर करताना पाहायला फार उत्सुकता आहे."मिस नवी मुंबई ही सौंदर्य स्पर्धा आता एक प्रतिष्ठित स्पर्धा बनली आहे, जी केवळ सौंदर्याचाच नव्हे तर बुद्धिमत्ता आणि आत्मविश्वासाचाही गौरव करते. ८ मार्च २०२५ रोजी होणारा ग्रँड फिनाले हा एक भव्य सोहळा असेल, जिथे स्पर्धक पारंपरिक वेशभूषा, वेस्टर्न वेअर आणि ईव्हनिंग गाऊन राऊंडमध्ये आपली चमक दाखवतील आणि नवी मुंबईच्या संस्कृतीचा उत्सव साजरा करतील.

या पत्रकार परिषदेस व्हीएसएन फिल्म प्रोडक्शन्सचे निर्माता संदीप नागराले विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

# श्री कांडकरी महिला मंडळाचा हळदी- कुंकू समारंभ भोईवाडा -मुंबई येथे दिमाखात साजरा

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर )**




रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यामधील देवरुख शहर पासून जवळच असलेल्या मु. पो. कासार कोळवण गावातील श्री कांडकरी विकास मंडळ, मुंबई आणि श्री कांडकरी महिला मंडळ आयोजित हळदी -कुंकू समारंभ दिनांक ९ फेब्रुवारी २०२५ रोजी भोईवाडा, मुंबई येथे मोठ्या उत्साहात आणि दिमाखात साजरा झाला. मुंबई आणि मुंबई परिसरातील महिला मोठ्या संख्येने या सभारंभास उपस्थित होत्या.या समारंभास सौ.गार्गी रविंद्र भाटकर(अँडव्होकेट मुंबई हायकोर्ट )या समारंभाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.त्यांनी आपल्या मनोगतात हळदी-कुंकू समारंभाचे महत्व विशद करत आपली ही अमूल्य परंपरा आणि संस्कृती आपण जतन केली पाहिजे असे आवाहनही केले. तसेच मंडळाच्या सदस्यांना कायदेशीर सल्ला आणि मदत करण्यास आपण तत्पर आहोत असे प्रतिपादन केले.या समारंभात अनेक महिलांनी आपली मनोगते सुंदररित्या सादर केली.आपल्या एकत्रित महिला शक्तीद्वारे समाजाच्या भल्यासाठी आपण नेहमीच सक्रिय राहू असे अनेक महिलांनी आवर्जून सांगितले.अनेक दिवसांनी भेटल्याचा उत्साह आणि हळदी-कुंकवाचे आदानप्रदान करताना महिलांचा आनंद ओसंडून वाहत होता. या समारंभातील मनोरंजनात्मक कार्यक्रमात सौ. शितल शशिकांत तोरस्कर आयोजित उखाण्यांचा बहारदार कार्यक्रम झाला.सदर हळदीकुंकू समारंभ यशस्वी होण्यासाठी श्री कांडकरी महिला सभासदांसोबतच श्री कांडकरी विकास मंडळाचे अध्यक्ष श्री. संतोष करंबेळे, सचिव श्री.राजाराम रावणंग, खजिनदार श्री.दिलीप तोरस्कर यांनी खूप परिश्रम घेतले.विशेषतः मंडळाचे उपसचिव श्री.राजू तोरस्कर यांनी उल्लेखनीय अशी कामगिरी बजावली आहे. सोबत श्री. दिपक करंबेळे आणि श्री.शशिकांत तोरस्कर यांनीही मोलाची मदत केली. अतिशय आनंदात आणि प्रसन्न वातावरणात झालेला हळदीकुंकू समारंभ महिलांसाठी संस्मरणीय ठरला.या संपूर्ण कार्यक्रमसाठी श्री कांडकरी विकास मंडळ, मुंबई आणि श्री कांडकरी महिला मंडळ पदाधिकारी, सदस्य, सभासद आणि सल्लागार, हितचिंतक यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी आभारप्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# दैनिक युवक आधार परिवाराच्या वतीने ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य रा. रं. बोराडे यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**भावपूर्ण श्रद्धांजली**

लातूर जिल्ह्याचे सुपुत्र, ग्रामीण कथाकार, ज्येष्ठ साहित्यिक स्व. रावसाहेब रंगराव बोराडे यांच्या निधनाचे दुःखद वृत्त समजले. त्यांच्या जाण्याने मराठी साहित्यविश्वाची अपूरणीय हानी झाली आहे. मराठवाड्यातील शेतकरी, कष्टकरी आणि ग्रामीण जीवनाचे अस्सल चित्रण त्यांच्या लेखणीतून साकार झाले होते. त्यांच्या कथा-लेखांनी असंख्य वाचकांच्या हृदयाला स्पर्श केला. सामाजिक वास्तवाचे प्रतिबिंब असलेल्या त्यांच्या साहित्याने ग्रामीण जीवनाचा संघर्ष आणि संवेदना प्रभावीपणे मांडल्या. त्यांच्या साहित्यिक योगदानाची उणीव कायम भासेल. त्यांना दैनिक युवक आधार परिवार वतीने विनम्र श्रद्धांजली!

**ओम शांती.**



# राज्य सरकारच्या विरोधात शेतकऱ्यांचे अर्धनग्न आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**रणजीत सिंह ठाकुर**

वाशिम जिल्ह्यात मागील तीन वर्षापासून अतिवृष्टी होवून अद्यापपर्यंत शेतकऱ्यांना दुष्काळी अनुदान मिळालेले नाहीत, तसेच शेतकऱ्यानी बँकेकडून घेतलेले पिळ कर्जाचा बोजा मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्याच्यासातबारावर चढविला आहे. मात्र शेतकऱ्यांचे पिककर्ज व इतर मागण्या अद्यापपर्यंत मंजुर न केल्याने सरकारने शेतकऱ्यांना नग्न करण्याचा प्रयत्न केल्या जात असल्यामुळे राज्य सरकारच्या विरोधात आज ११ फेब्रुवारी रोजी अनेक शेतकरी मुंबईच्या दिशेने धडकणार असून १२ फेब्रुवारी रोजी मंत्रालयावर अर्धनग्न आंदोलन केले जाणार असल्याचे शेतकऱ्यांनी निवेदन देवून इशारा दिला आहे. वाशिम जिल्ह्यात शेतकरी मागील तीन वर्षापासून कधी अतिवृष्टीने तर कधी कोरड्या दुष्काळाने होरपळून निघत आहे. शेतकरी पुर्णपणे आत्महत्येच्या आज वाशिम मधून शेतकरी निघून बुधवारी मंत्रालयावर धडकणार उंबरठ्यावर येवून ठेपला आहे. तरीही सरकारकडून कुठल्याही प्रकारची मदत केली जात नाही. तसेच २०२४ च्या पिकविमा, अतिवृष्टीचे अनुदान अद्यापही शेतकऱ्याच्या बँक खात्यात जमा झाले नसल्याने शेतकरी पुर्णपणे नग्न झाला आहे. मागील तीन वर्षापुर्वी शेतसाठी घेतलेले बँकांचे पिककर्ज हे अव्वाच्या सव्वा झाले आहे. शेतकऱ्यांच्या सातबारावर बोजा चढविला असल्यामुळे अनेक शेतकरी मेटाकुटीला आले आहेत. पिककर्जावर १२ टक्के व्याजलावून शेतकरीपुर्णतः नागडा करून ठेवला आहे. तसेच मुख्यामंत्री देवेंद्र फडणविस यांनी शेतकऱ्यांच्या पिककर्जाला कुठलाही प्रकारचे सिव्हील फ्रेंडीत प्रणालीचा वापर करणार नाही असे आश्वासन दिले होते. मात्र बँकांनी सिव्हील अभावी बँकांनी अनेक शेतकऱ्यांना वंचित ठेवले आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज कर्जमाफी योजनेच्या पुर्वी घेतलेल्या शेतकऱ्यांचे कर्ज माफ करावे, तसेच जिल्ह्यातील यासह इतर मागण्यासाठी आज ११ फेब्रुवारी रोजी वाशिम येथून अनेक शेतकरी मुंबईच्या दिशेने कुच केली आहेत. त्यानंतर १२ फेब्रुवारी रोजी मानखुर्द मुंबई या ठिकाणावरून मंत्रालयावर अर्थ नग्न आंदोलन अनेक शेतकरी करणार आहेत,



# शिर्डीत सौ.निशा गांवडे यांना साई गुणगौरव समाजभूषण पुरस्कार प्रदान

**पान १ वरुन** आला या प्रसंगी प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष. मा.श्री.सुदाम संसारे.सर. उपाध्यक्ष मा.वंदना गव्हाणे मॅडम. सल्लागार. मा.डॉ.अजय वारुळे.सर. कार्याध्यक्ष. मा.श्री.राजेश काळे.सर तसेच उद्योगपती मा.श्री.किशोरजी कालडा शेठ.बॉलिवुड अभिनेत्री.मा चित्रा दिक्षित.मॅडम. तसेच असंख्य मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार देण्यात आला.सौ.निशा गावंडे मॅडम. याची घरची परिस्थिती अतिशय हलाखीची आसताना त्यांनी अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथील 40.गावातील महिलांचे संघठण केले आहे.त्यांच्या अडीअडचणी सोडविल्या आहेत.त्यांनी आपल्या परिस्थितीवर मात करत दुसर्याच्या दुःखात स्वताहाला वाहुन घेतले आहे.त्यांना नुकताच बुलढाणा येथील समाजभूषण हा पुरस्कार दिनांक. 21.फेब्रुवारीला जाहीर झाला असुन अमरावती .जिल्ह्यातील परतवाडा येथील 40.गावातील महिलांच्या वतीने श्रेष्ठ नारी समाजभूषण पुरस्कार.2025. देण्यात आला आहे.तसेच साई च्या पावन व पवित्र भुमित परत दुसरा साई कलारत्न हा पुरस्कार सौ.निशा गावंडे मॅडम. अमरावती [परतवाडा] यांना नुकताच जाहीर झाला आहे.हा भव्य व दिव्य पुरस्कार येत्या. 3.मे.रोजी शिर्डीत हॉटेल शांतीकमल येथे देण्यात येणार आहे.हा पुरस्कार अभिनेत्री.मानसी नाईक व संस्थापक अध्यक्ष मा.श्री.सुदाम संसारे.सर यांच्या प्रमुख उपस्थितीत देण्यात येणार आहे.सौ.निशा गावंडे मॅडम यांनी अतिशय सुरेख व सुंदर पद्धतीने अमरावती जिल्ह्यातील परतवाडा मधील महीलांची जनजागृती करुन महिलांचे अतिशय मोठ्या प्रमाणात संघठण उभे केले आहे. या कामाची पावती म्हणून त्यांना शिर्डीत साई कलारत्न समाजभूषण पुरस्कार 2025.देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.आसे संस्थापक अध्यक्ष मा.श्री.सुदाम संसारे.सर यांनी सांगितले.

# कुकाणा येथील व्यापारी यांचा अब्दुल भैय्या शेख यांचे नेतृवात नेवासा तहसील वर मोर्चा

**दैनिक युवक आधार**
**नेवासा प्रतिनिधीः-**
**लखन वाल्हेकर**


कुकाणा येथील व्यापारी राज्य मार्ग रुंदीकरण दहा मिटर पेक्षा अंतर कमी करणेबाबत राष्ट्रवादी चे नेवासा युवा नेते अब्दुल भैय्या शेख यांचे नेतृत्वात मुक मोर्चा काढला. कुकाणा येथील अंतराचा खुलासा कारणे, दहा मिटर चे अंतर कमी करणे, अतिक्रमनातून निघालेल्या व्यापाऱ्यांचे पुनर्वसन करणेबाबत नेवासा नायब तहसीलदार सानप यांचे सोबत चर्चा केली.

पंधरा मीटर मधील अतिक्रमण ऐवजी दहा मीटर पर्यंत अतिक्रमण काढावे. नायब तहसीलदार सानप यांचे बरोबर युवा नेते अब्दुल भैय्या शेख आणि व्यापारी यांनी चर्चा केली.




अतिक्रमण दहा मीटर पर्यंत काढण्यात यावे या करिता मोर्चे करी व शेख हे जिल्हा अधिकारी यांची देखील भेट घेणार आहे. हजारो कुटुंबाची गुजराण या रस्त्यालागत असणाऱ्या दुकानावर अबलंबून आहे. कित्येक वर्षांपासून दुकानदार यांची उपजीविका गुजरण याच व्यवसायावर अवलंबून आहे. उपजीविका करण्यासाठी दुसरे साधन नाही. मुलांचे संगोपन, शिक्षण, लग्न आदी. दुकानातून मिळणाऱ्या उत्पन्नावर हजारो कुटुंबातील लोकांची उपजीविका अवलंबून आहे. सदरील व्यापारी यांनी स्वतःहून रोड लगत असणाऱ्या दोन्ही बाजूला साईड गटार च्या बाहेर अतिक्रमण केले आहे. दोन तीन वर्षांपूर्वी अतिक्रमण होऊ नये म्हणून ही साईड गटार बनवण्यात आली होती. तेथील अतिक्रमण दुकानदार यांनी स्वतःहून काढून घेतले आहे. तरी दुकानदार आणि त्यांचे कुटुंब यांचा विचार करून योग्य ते कारवाई व्हावी व अतिक्रमण करणारे व्यापारी आणि त्यांच्या कुटुंबाला न्याय द्यावा. भेंडा कुकाणा येथील साईड गटार बाहेर असणारे व्यापारी दुकान अतिक्रमण चौपदरी रस्ता मंजुरी येऊ पर्यंत राहू द्यावे. सुमारे हजार ते बाराशे व्यापारी आणि त्यांचे कुटुंब उपजीविका करिता या दुकानावर अवलंबून आहे. भेंडा येथील दुकानदार विस ते पंचवीस गावे आणि कुकाणा बाजारपेठ येथे देखील विस ते पंचवीस गावांची बाजारपेठ या महत्वाच्या भेंडा आणि कुकाणा येथील व्यापाऱ्यांवर दैनिक गरजा भागणारे व्यवसाय आहे. दुकानदार यांचे कायम स्वरूपी पुनर्वसन करावे अशी जिल्हा अधिकारी साहेब शासन आणि प्रशासन ला मागणी. आमच्या विनंतीचा मागणीचा विचार न झाल्यास नाईलाजास्तव आम्हांला आंदोलन करावे लागतील. यास सर्वस्वी जबाबदार शासन आणि प्रशासन राहील. आज माझ्या मतदारसंघातील कुकाणा येथून व्यापारी समितीच्या प्रतिनिधींसह नेवासा तहसील कार्यालयास निवेदन देण्यासाठी गेलो. त्या वेळी माझ्या सोबत सर्व सहकारी व्यापारी उपस्थित होते. नेवासा तहसील कार्यालयावर आज एक भव्य मोर्चा काढण्यात आला. यावेळी नायब तहसीलदार साहेबांनी निवेदन स्वीकारत यावर योग्य मार्ग काढू असे आश्वासन दिले. व्यापाऱ्यांच्या हिताच्या निर्णयासाठी, आम्ही नेहमीच व्यापाऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत. भविष्यात देखील व्यापाऱ्यांना न्याय मिळेपर्यंत आणि त्यांचे पुनर्वसन होईपर्यंत आम्ही त्यांच्याबरोबर ठामपणे उभे राहू असे शेख यांनी म्हंटले आहे

# कवि सरकार इंगळी यांच्या गावाकडं या काव्यसंग्रहाचे होणार प्रकाशन




**दैनिक युवक आधार**
**हातकणंगले प्रतिनिधी**

रविवार दिनांक १६ फ्रेबुवारी २५ रोजी विवेक वाचनालय अबंप व कवि सरकार स्वाभिमानी वाचनालय इंगळी आयोजित राज्यस्तरीय २२ वे छ. शंभूराजे समाजप्रबोधन मराठी ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे सदर साहित्य संमेलनात पत्रकार लेखक कवि सरकार इंगळी यांच्या गावाकडं या ग्रामीण शेतीमातीशी ' गावाकडचे सणवार धार्मिक भाव अशा विविध अंगी असलेल्या कविता संग्रहाचे प्रकाशन बॉलिवूड चित्रपट अभिनेत्री चित्रा दिक्षित दक्षिण मुंबई यांच्या हस्ते व उपस्थित मान्यवरांच्या समवेत प्रकाशन करणेत येणार आहे . यापूर्वी कवि सरकार यांची निखारा हा पेटला , कवि सरकाराच्या कविता ,हिरवा माझा मळा' ,नांगरणी , हे काव्य संग्रह प्रकाशित झाले आहेत . त्यांचा गावाकडं हा पाचवा काव्यसंग्रह प्रकाशित होत आहे .

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## शालेय पॉवरलिफ्टिंग १७ वर्षा आतील राज्य स्पर्धेत रायगडची - गायत्री महेश बडेकर स्ट्रॉंग वुमन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक संचालनालय पुणे यांच्या कार्यक्रमांतर्गतअकोले येथे शालेय राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धा नुकतीच पार पडली. या स्पर्धा अकोला येथील क्रीडा अधिकारी* कार्यालयाने दिनांक ६ आणि ७ फेब्रुवारी २०२५फेब्रुवारी रोजी आयोजित केली होती. या स्पर्धेत 17 वर्षाआतील* *मुलींच्या43किलो वजनी गटात गायत्री महेश बडेकर (आर्चीड कॉलेज कशेले, कर्जत) हिने सुवर्णपदक प्राप्त केले. तर 47 किलो* *वजनी गटात जानवी चंद्रकांत थोरवे (के.ई. एस.,कर्जत) हिने रौप्य पदक प्राप्त केले.या स्पर्धेचे उद्घाटन माननीय आमदार नितीन बापू देशमुख यांनी केले होते.स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशन सचिव संजय प्रतापराव सरदेसाई यांचे मार्गदर्शना झाले.




*तसेच 19 वर्षा आतील मुलींच्या 43 किलो वजनी गटात अचल नवीन राजभर (अभिनव ज्ञान मंदिर,जूनियर कॉलेज, कर्जत) हिने सुवर्णपदक प्राप्त केले. तर 63 किलो वजनी गटामध्ये वैष्णवी गणेश गंगावणे (अभिनव ज्ञान मंदिर, जुनियर कॉलेज, कर्जत) हिने सुवर्णपदक पटकावले. तर स्पर्धेतील स्ट्रॉंग वुमन हा किताब गायत्री महेश बडेकर.(ऑर्चिड कॉलेज कशेले) हिने पटकावला तिने एकूण तीनशे किलो वजन स्कॉट, बेंचप्रेस आणि डेडलिफ्ट या प्रकारात उचलले.जिल्हास्तरीय स्पर्धेत सुद्धा ती किताबाची मानकरी झाली होती.या खेळाडूंची राज्य स्पर्धेसाठी निवड मुंबई विभागीय स्पर्धेतून उत्कृष्ट कामगिरीमुळे झाली होती. गायत्री बडेकर हिला राष्ट्रीय वेटलिफ्टिंग पॉवरलिफ्टिंग खेळाडू हनुमंत खरात यांचे मार्गदर्शन लाभले आहे.तर अभिनव कॉलेज च्या खेळाडूंना नवनाथ दाभाडे सर यांचे मार्गदर्शन आणि श्रीमती धनश्री कानडे मॅडम यांचे सहकार्य लाभले आहे.

रायगडच्या राज्यस्तरीय शालेय स्पर्धेतील खेळाडूंच्या.कामगिरीमुळे पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे अध्यक्ष गिरीश शरद वेदक,सचिव अरुण लक्ष्मण पाटकर , सहसचिव सचिन विठ्ठल भालेराव, सदस्य संदीप कृष्णा पाटकर, कार्याध्यक्ष यशवंत अंबाजी मोकल, मानस कुंटे यांनी आनंद व्यक्त केला आणि आगामी काळातील स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील अंकिता मयेकर मॅडम यांनी सुद्धा आनंद व्यक्त केला आहे.

# कोष्टी व्हिजन ट्रस्ट तर्फे श्री. शाकंभरी सिध्दपीठात धार्मिक व सामाजिक कार्य

**दैनिक युवक आधार**
**सातारा वार्ताहर**
**गुरुनाथ तिरपणकर**

**सातारा -** कोष्टी व्हिजन ट्रस्ट (केव्हीटी) तर्फे पौष पौर्णिमेनंतर महाराष्ट्रातील नागेवाडी, जि.सातारा येथील एकमेव पुरातन व सिध्दपीठ श्री.शाकंभरी देवी मंदिरात सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. यावर्षी महिलांना श्री. शाकंभरी देवी दर्शन तसेच विविध क्षेत्रात प्राविण्य मिळवलेल्या ०५ ते १८ वयोगटातील मुला मुलींना प्रोत्साहनपर पुरस्कार वितरण असा दुहेरी कार्यक्रम रविवार दि. ०९ फेब्रुवारी २०२५ रोजी श्री. शाकंभरी देवी मंदिरात संपन्न झाला. सातारा जिल्हयातील कोष्टी समाज अध्यक्ष व उपस्थित समाज बांधव यांचे हस्ते पुजा व आरतीने कार्यक्रमाची सुरूवात झाली. महाराष्ट्र कोष्टी समाज सेवा मंडळ, मुंबईचे माजी विश्वस्त व सरचिटणीस अड. श्री. ज्ञानदेव सरोदे हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तर कोष्टी




समाज सेवा मंडळ, डोंबिवलीच्या अध्यक्षा सौ. अनिता वाघवकर या विषेश अतिथी होत्या. याप्रसंगी सन्माननीय उपस्थितीत कोष्टी समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. अरूणराव वरोडे, इचलकरंजीचे उद्योगपती सौ. व श्री. उत्तमराव म्हेत्रे, सातारा जिल्हा परिषदेचे मा. शिक्षण व अर्थ सभापती अड. भास्करराव गुंडगे, बारामतीचे श्री. रमेश भंडारे, उंब्रजचे अध्यक्ष श्री. विवेक लाटे, साताऱ्याचे श्री. संदिप पवेकर, कोरेगावचे अध्यक्ष श्री. आनंद गोरे, पुसेगावचे श्री. संतोष तारळकर, तारळेचे श्री. औदुंबर कुरकुटे, कोळेवाडीचे श्री. अमृत नेमाणे, कुडाळचे श्री. प्रमोद खटावकर यांसह अनेक भागातून आलेले कोष्टी समाज बांधव उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख पाहूणे अड. ज्ञानदेव सरोदे यांनी केव्हीटी तर्फे सुरू असलेल्या समाजोपयोगी व संघटनात्मक कार्याचा गौरव करून यापुढेही केव्हीटीचे कार्यात सहभागी होईल असे सांगितले. श्री. शाकंभरी देवीचे एकमेव सिध्दपीठ असलेल्या मंदिरात सामाजिक कार्यक्रमाचे आयोजनामुळे मंदिर परीसर पाहण्याची संधी व कुलदेवीचे दर्शन केव्हीटीने घडवले असे विषेश अतिथी सौ. अनिता वाघवकर यांनी सांगितले. राष्ट्रीय अध्यक्ष श्री. अरूणराव वरोडे यांनी मुलांना दिलेल्या पुरस्काराचे विषेश कौतुक केले. तसेच केव्हीटी तर्फे बारामतीत घेणेत येणाऱ्या राज्यस्तरीय अधिवेशनास सर्वोपरी मदत व सहकार्य करेल असे आश्वस्त केले. प्रा. श्री. दिनेश सरोदे, दहिवडीच्या माजी नगराध्यक्षा सौ. साधना गुंडगे, वाईचे श्री. सुनिल कुमठेकर आदींनी मनोगत व्यक्त केले. महिलांना श्री शाकंभरी देवी दर्शन घडावे तसेच युवा पिढीला केवळ प्रोत्साहन न देता कुलदेवी दर्शन, कुलाचार, संस्कार व त्यांचेत धार्मिक भावना वाढावी या हेतूने मंदिरात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे संस्थापक सचिव अड. सचिन देवांग यांनी प्रास्ताविकात सांगितले. पुरस्कार वितरण कार्यक्रम व सुत्रसंचालन खजिनदार अड. संदेश गुंडगे यांनी केले. दहिवडीच्या गुरूकृपा भजनी मंडळाने भजन सेवा दिली. केव्हीटी तर्फे महिलांना जवळच असलेल्या श्री क्षेत्र संगम माहुलीचे देखील दर्शन घडविण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन टिम केव्हीटी समन्वयक सौ. स्वाती भंडारे, सौ. सुवर्णा भुजबळ, सौ. सुवर्णा सरोदे, अड. सुषमा देवांग यांनी केले. वृत्तांकन व प्रसिध्दी केव्हीटी कार्याध्यक्ष श्री. गुरूनाथ तिरपणकर यांनी केली.

## सातारा लिंबचे पोलीस पाटील सुरेशराव सोपानराव पाटील यांनी सातारच्या नूतन जिल्हाधिकारी संतोष जी पाटील यांचे स्वागत करीत शुभेच्छा दिल्या,

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे**

सातारा लिंबचे पोलीस पाटील सुरेशराव सोपानराव पाटील यांनी सातारच्या नूतन जिल्हाधिकारी संतोष जी पाटील यांचे स्वागत अन् शुभेच्छा दिल्या साताऱ्यातील उत्कृंष्ट कामाचे बक्षीस म्हणून साताऱ्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांची पुणे जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती, खास उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी जितेंद्र डूडी पुणे जिल्हाधिकारी म्हणून बक्षीस जाहीर केले होते, तर त्यांच्या रिक्त जागेवर पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील यांनी सातारा जिल्हाधिकारी म्हणून 2 जानेवारी 2025 रोजी पदभार स्वीकारला आहे, आज सातारा जिल्हाधिकारी दालनामध्ये सातारा लिंबगाव चे कर्तव्यदक्ष पोलीस पाटील सुरेशराव सोपानराव पाटील यांनी त्यांची सदिंच्छा भेट घेत आपला परिचय देवून स्वागत करीत शुभेच्छा दिल्या, यावेळी नूतन जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी त्यांच्या स्वागताचा स्वीकार केला, साताऱ्यात यापूर्वीच्या जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्याच्या ठिकाणी राखलेली परंपरा संतोष पाटील हे कायम ठेवतील पर्यटन प्रकल्प, माझी शाळा आदर्श शाळा तसेच स्मार्ट पीएचसी असे काही महत्वकांक्षी प्रकल्पांना संतोष पाटील हे गती देतील अशी आशा



सातारकरांकडून व्यक्त होत आहे, जिल्हाधिकारी संतोष पाटील हे मूळचे उंडेगांव (ता. बार्शी) सोलापूर येथील कार्यक्षम आणि मितभाषी अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे, त्यांनी आत्तापर्यंत प्रांताधिकारी, उपजिल्हाधिकारी, विशेष भूमी संपादक अधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी, रोहयो उपजिल्हाधिकारी, प्रादेशिक अधिकारी, एमआयडीसी, मुख्यमंत्र्यांचे कार्यकारी अधिकारी अशा विविध पदावर त्यांनी आतापर्यंत आपल्या कामाचा चांगलाच ठसा उमटविला आहे,

## मिस टीन नवी मुंबईचा” किताब उलवे येथील कु.काव्या म्हात्रेने जिंकला


**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील**

**क्लासिक फॅशन फिएस्टा सीझन-** 2 च्या वतीने आयोजित “मिस टीन नवी मुंबईचा” किताब उलवे येथील कु.काव्या हिमांशू म्हात्रे ने जिंकला,असल्याने तिच्यावर सर्वस्थरांतून कौतुका बरोबरच अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सीडको ऑडिटोरियम नवी मुंबई वाशी येथे 9 फेब्रुवारी 2025 रोजी क्लासिक फॅशन फिएस्टा सीझन 2 या स्पर्ध्येत एकूण 19 स्पर्धकांनी सहभाग घेतला होता या सर्व स्पर्धकांना मागे सारीत उलवे येथील काव्या म्हात्रेने “मिस टीन नवी मुंबईचा” किताब जिंकला आहे., तिने याबतचे प्रशिक्षण क्लासिक फॅशन फिएस्टाच्या संस्थापीका डॉ. स्मायली पॉल यांच्या मार्गदर्शनाखाली घेतले होते. काव्या म्हात्रेने मिळविलेल्या यशाबाबत सांगताना डॉ. स्मायली पॉल म्हणतात की, काव्याच्या व्यक्तिमत्वात खूप क्षमता आहे, आणि ही तिच्या मॉडेलिंग करिअरची फक्त सुरुवात आहे. तिने केवळ मिस टीन नवी मुंबईचा किताबच मिळविला नाहीतर क्वीनचा 25,000 रुपये किमतीचा फोटोशूटही जिंकला आहे. तिने जर अशीच मेहनत घेतली तर ती भविष्यात विश्वसुंदरी किताबही जिंखू शकेल असा आत्मविश्वासही डॉ. स्मायली पॉल यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केला. काव्याच्या आईवडिलांनी सांगितले की, काव्याची मेहनत आणि तिचे कठोर प्रयत्न यामुळे तिचे स्वप्न पूर्ण झाले आहे.. तसेच, काव्याने क्लासिक फॅशन फिएस्टा सोबत जोडल्या बद्दल सैंडी शर्मा यांचे आभार मानले. क्लासिक फॅशन फिएस्टा हे लहान मुलं, टीनएजर्स आणि मिसेस साठी एक चांगले व्यासपीठ आहे, ते भारतीय आणि पाश्चात्त्य संस्कृतीचा एक सुंदर मिलाफ असल्याचे दर्शवते त्याच बरोबर महिलांच्या सक्षमीकरण व व्यक्तिमत्वाचा विकासास करण्या साठी प्रोत्साहन देते. क्लासिक फॅशन फिएस्टा ये थे केवळ काम करणेच शिकवले जात नाही तर संवाद कौशल्याचा विकसित करण्यावरही भर दिला जातो.असे काव्याच्या आई-बाबानी सांगितले तर आपल्या यशा बाबत बोलताना काव्या म्हणाली मला लहानपणापासूनच मॉडेलींग क्षेत्राची आवड होती, या साठी कोणतेही परिश्रम घेण्याची माझी तयारी होती.ती मी पूर्ण केली या कामी मला माझी आई सौ.तुप्ती हिमांशू म्हात्रे आणि बाबा हिमांशू शशिकांत म्हात्रेयांचे आशीर्वाद व वेळोवेळी त्यांनी केलेले सहकार्य आणि माझ्या या क्षेत्रातील गरु डॉ. स्मायली पॉल व सैंडी शर्मा याचे मी विशेष आभार मानते असे ती ने शेवटी सांगितले




## परतूर येथे विश्वकर्मा जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**परतूर- जालना**
**अशोक ठोके**



परतूर शहरात प्रभू विश्वकर्मा जयंती सांगुळे कॉम्प्लेक्स मध्ये उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रभू विश्वकर्मांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी केली. यावेळी दयानंद सांगूळे, अनिल सांगुळे, सुशील सांगूळे, योगेश सागुळे, अशोक पवार, नरपत जांगिड, बालाजी सांगुळे, मुकुंद गायकवाड, गणेश सांगुळे आदींची उपस्थिती होती.



दैनिक युवक आधार – मिल्लत सेमी इंग्लिश स्कूल बीडचे स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात व जल्लोषात संपन्न झाले. या मध्ये शेख झैनब मतीन सह शाळेतील बाल कलाकार विद्यार्थ्यांनी मनमोहक नृत्य सादर करून पालक प्रेक्षकांची मने जिंकली. या वेळी ढगावर पाय या गीतावर नृत्य सादर करून शेख झैनब मतीन यांने प्रथम क्रमांक पटकाविला. या कार्यक्रम प्रसंगी बहुसंख्येने पालक वर्ग उपस्थित होता.
**(छाया - शेख महेशर ताहेर पाटोदा.)**

# पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी पुनर्वसनासाठी पुढाकार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**

महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी पुनर्वसनासंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुढाकार घेतला असून त्या संदर्भात पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत, माजी नगरसेवक नितीन पाटील, यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. पनवेल एसटी बसस्थानक ते रेल्वे स्टेशन परिसरातील झोपडपट्टी परिसरात विकास आराखड्यामुळे निर्माण झालेल्या संभ्रमाबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी यापूर्वीच झोपडपट्टी धारकांना दिशाभूल करणाऱ्यांपासून सावध



राहण्याचा सल्ला दिला आहे. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत सर्वेक्षण सुरू असल्यामुळे पुनर्वसन निश्चित होईल, आणि एकही झोपडपट्टीधारक बेघर होणार नाही, असे त्यांनी आश्वासित करून झोपडपट्टी वासियांना मोठा दिलासा दिला होता. त्यावेळी झोपडपट्टी वासियांच्या पुनर्वसनासाठी पालिका आयुक्तांची भेट घेऊ, गरज भासल्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री व संबंधित अधिकाऱ्यांना भेटून हा प्रश्न मार्गी लावू असे आश्वासन देत तुम्हाला सर्वाना न्याय भेटेल आणि जो पर्यंत पुनर्वसनाच्या बाबतीत न्याय मिळत नाही तो झोपड्पट्टीवासियांच्या एकाही घराला हात लावू देणार नाही, असा विश्वास देत भाजप तुमच्या पाठीशी काल होता आज आहे आणि उद्याही राहील, असे आश्वासित केले होते. त्यानुसार आयुक्त मंगेश चितळे यांच्यासमवेत आमदार प्रशांत ठाकूर यांची बैठक झाली. पनवेल महानगरपालिका हद्दीतील झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन हा महत्वाचा विषय असून, त्या कामासाठी आमदार प्रशांत ठाकूर सातत्याने प्रयत्नशील राहिले आहेत. त्या अनुषंगाने झालेल्या या बैठकीत प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन करण्याची प्रक्रिया होत असताना अधिकृत फॉर्मचे वाटप करताना काही राजकीय संघटनांकडून पैसे वसूल केले जात असल्याचे या बैठकीच्या माध्यमातून आयुक्त मंगेश चितळे यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले. या संदर्भात अधिकाऱ्यांनी झोपडपट्टी परिसरांमध्ये जाऊन जनजागृती करण्याची आवश्यकता असल्याचे या बैठकीत ठरविण्यात आले, त्यामुळे लाभार्थ्यांना कोणत्याही प्रकारच्या फसवणुकीपासून वाचवता येणार आहे. तसेच या बैठकीत झोपडपट्टीवासीयांसाठी अधिक प्रभावी उपाययोजना आखण्याचे ठरवण्यात आले आणि या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी त्वरित पावले उचलण्यावर भर देण्यात आला असून आमदार प्रशांत ठाकूर, आयुक्त मंगेश चितळे यांच्या नेतृत्वाखाली पनवेल महानगरपालिका झोपडपट्टीवासीयांना सुरक्षित, स्वच्छ, आणि चांगल्या राहणीमानासाठी वचनबद्ध नियोजन करण्यात येत आहे. त्यामुळे झोपडपट्टी धारकांसाठी एक महत्वाचे आणि सकारात्मक उचलले गेले आहे.

# खेळाडुवृत्तीचे प्रदर्शन करा व विभागासाठी कार्यक्षमतेने कार्य करा- जलसंपदा मंत्री गिरीश महाजन

राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये खेळाडुवृत्तीचे उत्तम प्रदर्शन करा, आयुष्यात शरीर सदृढ ठेवा, व्यसनापासून दूर रहा आणि जलसंपदा विभागासाठी कार्यक्षमतेने कार्य करा, असा संदेश जलसंपदा मंत्री गिरीश

### ज्योत्सना मॅडम विदर्भ सचिव दै यूवक आधार
### जलसंपदा विभागाच्या चतुर्थ राज्यस्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेची दिमाखदार सुरुवात
### 1600 अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सहभाग; 2 फेब्रुवारीपर्यंत स्पर्धेचे आयोजन

महाजन यांनी येथे विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना दिला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापिठाच्या रवि नगर येथील क्रीडा संकुलात जलसंपदा विभागाच्या चतुर्थ राज्यस्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा-2025 चे उद्घाटन श्री. महाजन यांच्या हस्ते झाले, यावेळी ते बोलत होते. वित्त व नियोजन राज्यमंत्री अड. आशिष जयस्वाल, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव संजय बेलसरे आदी उपस्थित होते. जलसंपदा विभागाच्या एकूण 9 विभागांचे 1600 खेळाडू सहभागी झाले असून 2 फेब्रुवारी 2025 पर्यंत या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. जलसंपदा मंत्री श्री. महाजन म्हणाले, राज्यातील उद्योग, शेती, उर्जा प्रकल्प आदिंना पाणी पुरवठा करण्याची महत्वाची भूमिका जलसंपदा विभाग पार पाडत आहे. विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेमुळे हे कार्य अधिक प्रभावीपणे करता येते. त्याकरिता त्यांचे आरोग्य उत्तम राहणे आवश्यक आहे. उत्तम आरोग्यासाठी व्यायाम, आहार, विहार गरजेचा आहे. तसेच व्यसनापासून दूर राहणे तेवढेच महत्वाचे आहे. हे लक्षात घेवूनच या विभागाचा मंत्री म्हणून 2017 मध्ये छत्रपती संभाजी नगर येथे जलसंपदा विभागाची पहिली राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित



करण्यात आल्याची आठवणही त्यांनी यावेळी सांगितली. स्वतः एक उत्तम खेळाडू असून गेल्या जवळपास 40 वर्षांच्या राजकीय जीवनातील व्यस्ततेतही नियमीत व्यायाम करतो व व्यसनापासून दूर असल्याचे सांगून त्यांनी स्पर्धेत सहभागी सर्व खेळाडुंना शुभेच्छा दिल्या. वित्त व नियोजन राज्यमंत्री अड. आशिष जयस्वाल यांनी शासकीय नोकरीमध्ये कामासोबतच खेळाला असलेल्या महत्वाबद्दल मार्गदर्शन केले. तसेच राज्य शासनाच्या विविध विभागांच्या आंतरविभागीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा व्हाव्यात, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. स्पर्धेमध्ये जिंकण्याची इच्छाशक्ती शेवटपर्यंत कायम ठेवून खेळाडुवृत्तीचे उत्तम प्रदर्शन करा,असा संदेश अपर मुख्य सचिव दीपक कपूर यांनी यावेळी दिला. कार्यक्रमाची सुरूवात राष्ट्रगीत व महाराष्ट्र गिताने झाली. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या अधिक्षक अभियंता सोनाली चोपडे यांनी क्रीडा शपथ दिली. सचिव संजय बेलसरे यांनी प्रास्ताविक केले. रेणुका देशकर यांनी सूत्रसंचलन केले तर विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक राजेश सोनटक्के यांनी आभार मानले. तत्पूर्वी, श्री. महाजन यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलीत करून या स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला. पोलीस बँड पथकाच्या तालावर दहा संघांनी यावेळी पथ संचलन केले. यात मंत्रालय मुंबई संघ, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ छत्रपती संभाजी नगर, तापी पाट बंधारे विकास महामंडळ जळगाव, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणे, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ ठाणे, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था नाशिक, यांत्रिकी पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय पुणे, गुणनियंत्रण, जलविद्युत, मुख्यलेखा परीक्षक, जल व सिंचन छत्रपती संभाजीनगर, स्वेच्छेने सहभागी झालेले शेगाव येथील गजानन महाराज संस्थेचे सेवेकरी, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर अशा 10 संघांचा समावेश होता. शुभारंभाच्या कार्यक्रमानंतर श्री. महाजन यांच्या हस्ते 100 मिटर धावण्याच्या स्पर्धेला हिरवी झेंडी दाखवून या आयोजनातील पहिल्या स्पर्धेचे उद्घाटन झाले. स्पर्धेत सहभागी 1600 खेळाडुंपैकी 550 महिला खेळाडू असून क्रिकेट, कबड्डी, व्हॉली बॉल आदी क्रीडा स्पर्धांसह गायन, संगीत, नाटक, एकांकिका, छायाचित्र आदी सांस्कृतिक स्पर्धा होणार आहेत.

## हिमायतनगर पोलीसांनी रेतीची चोरी उघडकीस आणुन पाच लाख पाच हजार रु ची मालमत्ता केली जप्त...

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी माधव काईतवाड बोरगडीकर**

**हिमायतनगरः-** नांदेड जिल्ह्यामध्ये वाळु माफीया कडुन अवैद्य मार्गाने वाळू उपसा व वाहतुक करुन शासनाचा लाखो रुपयाचा महसुल बुडविला जात असल्याने मा.श्री. अबिनाश कुमार पोलीस अधिक्षक नांदेड यांनी पो.स्टे. हद्दीत अवैद्य वाळू उपसा व वाहतुक संदर्भात कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने दि.11/02/2025 रोजी पोलीस स्टेशन हद्दीत गस्त करीत असताना 02.10 वाजेच्या सुमारास गोपनीय बातमीदार मार्फत माहीती मिळाली कि, दिघी शिवारालगत, पैनगंगा नदी पात्रामध्ये एक निळ्या रंगाचा सोनालिका कंपनीचा ट्रॅक्टर व लाल रंगाची ट्रॉली वाळुने भरुन चोरटी वाहतुक करीत असलेबाबत खात्रीशीर माहीती मिळाल्याने आम्ही 02.25 वा.चे सुमारास नमुद ठिकाणी जाऊन पहाणी केली असता नमुद ट्रॅक्टरमध्ये दाजे एक ब्रास वाळु भरलेली दिसुन आली. म्हणुन नमुद आरोपीतांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमुद गुन्ह्यात एक निळ्या रंगाचा सोनालिका कंपनीचा ट्रॅक्टर क्र. MH-29-AQ-2876 व लाल रंगाची ट्रॉली कि.अं.5,00,000/- रु.) व अंदाजे एक ब्रास वाळु कि.अं.05,000/- रु. अशी एकूण 05,05,000/- रु. ची मालमत्ता जप्त करण्यात आली असुन पो.स्टे. हिमायतनगरचे सपोउपनि/जाधव यांचे फिर्यादं वरुन हिमायतनगर पोलीस ठाणे येथे वर प्रमाणे आरोपी 1)




गजानन श्रीराम माने, 37 वर्ष, धंदा चालक, रा.ठि. बोरी, ता. उमरखेड, जि. यवतमाळ 2) नारायण कोडबा माने, 62 वर्ष, मालक, रा.ठि. बोरी, ता. उमरखेड, जि. यवतमाळ यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास बिट पोहवा/2204, पाटील हे करीत आहेत. यामध्ये उत्कृष्ट कामगिरी केली असून मा. वरिष्ठांनी अभिनंदन केले आहे.

# मोस्ट डिजिटली सक्षम "पुरस्काराने पुरस्कृत येल्लो अंब्रेला.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**




दिनांक ७ फेब्रुवारी रोजी "इमर्जिंग बिझनेस अवॉर्ड "सोहळा दिल्ली येथे पार पडला. साधारणता २०१३ मध्येच विशिष्ट वैशिष्ट्यांसाठी औपचारिक प्रमाणीकरण झालेली अग्रगण्य व २१ व्या शतकातील तथा डिजिटल युगातील सर्वात मोठी आघाडीची डेटाबेस कंपनी तसेच संपूर्ण भारतातील जागतिक पोहोच असलेली विकसित लीडिंग मार्केटिंग कंपनी म्हणजेच "येल्लो अम्ब्रेला सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड" येलो अम्ब्रेला कंपनीच्या भारतभर दिल्ली, मुंबई, बेंगलोर, हैदराबाद, चेन्नई येथे अनेक शाखा आहेत. ही संस्था गेली अनेक वर्ष टेलीकॉलिंग, इव्हेंट मॅनेजमेंट, डिजिटल मार्केटिंग, प्रवास, लॉजिस्टिक्स, ई-कॉमर्स प्रशिक्षण, सल्ला, ई-मेल आणि डेटा मार्केटिंग या सेवा तसेच उत्पादन व सेवा प्रचार व विक्री यामध्ये आघाडीवर आहे. तसेच दरवर्षी फॅशन इव्हेंट्स, सौंदर्य स्पर्धा, रियालिटी शो, फूड फेस्टिवल डेकोर, हॉटेल डेकोर, अन्युअल कॉर्पोरेट फंक्शन इत्यादीचे आयोजन करत असते. तिच्या ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी नवीन नवीन अपडेटेड यद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करते. येलो अम्ब्रेला कंपनी आज पर्यंत अनेक पुरस्कारांनी सन्मानित देखील झालेली आहे. भारत सरकारच्या सहाय्याने एबीपी नेटवर्क सर्वेक्षणाद्वारे इमर्जिंग १०० म्हणून तिची ओळख आहेच. कंपनी ऑफ द इयर २०१४, सीईओ मॅक्झिन कंपनी ऑफ द इयर २०२१, बेस्ट एम एस एम इ अवॉर्ड फोर कॉलिटी एक्सीलेंस, प्राइड ऑफ भारत २०२३ असे अनेक अवॉर्ड्स येलो अंब्रेलाने मिळवले आहेत. नवी दिल्ली येथे पार पडलेल्या सहाव्या आवृत्तीच्या इमर्जिंग बिझनेस अवॉर्ड फंक्शनमध्ये येलो अम्ब्रेलाला "मोस्ट डिजिटली सक्षम कंपनी "या पुरस्काराने पुरस्कृत करण्यात आले. यावेळी तिचे संस्थापक तथा संचालक योगेश अग्रवाल यांनी हा पुरस्कार कंपनीचा नसून कंपनीशी जोडलेल्या प्रत्येक व्यक्तीचा, कंपनीच्या संपूर्ण परिवाराचा तसेच त्यांच्या कठोर परिश्रमांचा आहे, व "मोस्ट डिजिटली सक्षम कंपनी " ही ओळख कंपनीच्या डिजिटल इनोव्हेशन तंत्रज्ञानाच्या चलित उत्कृष्टतेवर प्रकाश टाकते. असे उदगार कृतज्ञ पणे व्यक्त केले.



**दैनिक युवक आधार -** भारतीय जनता पक्षाचे सहसंस्थापक पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुण्यतिथी निमित्त पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करण्यात आले. साधी राहणी व उच्च विचारसरणी हा त्यांचा स्थायीभाव होता. शास्त्रे, धर्मग्रंथ, आणि तात्त्विक ग्रंथांच्या चिंतनातून व मननातून त्यांनी 'एकात्ममानववाद' हा सिद्धान्त मांडला व भारतीय समाजापुढे ठेवला. त्यांना भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, मागासवर्गीय सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, कामगारनेते रवींद्र नाईक, के.सी. पाटील गुरुजी, विश्वजित पाटील, अशोक आंबेकर, अंकुश पाटील, शत्रुघ्न उसाटकर, महेंद्र गोजे, यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभिवादन केले.

# बेलापूर डोंगर उतारावर ३० बेकायदेशीर बांधकामे

## मानवी साखळीने विरोध; इर्शाळवाडीसारख्या आपत्तीचा इशारा

**नवी मुंबई :** न्यायालयीन आणि सरकारी निर्देशांना न जुमानता बेलापूर डोंगर उतारावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करण्यात आल्याच्या विरोधात रविवारी सकाळी नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर येथे शेकडो लोकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शवत मानवी साखळी तयार केली.




"आम्ही सर्वजण अस्वस्थ आहोत, कारण काही स्वार्थामुळे हिरवळ खराब झाली आहे. आम्ही सर्वजण येथे एकता दाखवण्यासाठी आणि अशा प्रकारे आमची जंगले नष्ट होऊ देणार नाही यावर भर देण्यासाठी आलो आहोत.
- कर्नल बेंजामिन, माजी सैनिक

नाटकनेक्ट फाऊंडेशनने सांगितले की, डोंगरउतारावर सुमारे ३० धार्मिक वास्तू उभ्या राहिल्या आहेत, त्यांनी २.३ लाख चौरस फूट जमीन बळकावली आहे. ही बांधकामे शहर नियोजक सिडकोने बेकायदेशीर ठरवून पाडण्याच्या नोटिसा बजावल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या २००९ च्या आदेशानुसार या वास्तूंना जावे लागेल, ज्यामध्ये सार्वजनिक ठिकाणी मंदिरे, चर्च आणि मशिदी, गुरुद्वारांना बंदी घालण्यात आली होती.

टेकडी आणि लोकांना भूस्खलनापासून वाचवण्यासाठी मोहीम सुरू करणारे नॅटकनेक्टचे संचालक बी. एन. कुमार म्हणाले की, राज्य सरकारने गेल्या ऑगस्टमध्ये महाराष्ट्र मानवाधिकार आयोगाला (एमएसएचआरसी) वचन दिले होते की सिडको या वास्तू पाडेल.

एमएसएचआरसीच्या आदेशानंतर जवळजवळ सहा महिने उलटूनही कोणतीही कारवाई झालेली नाही. उलट काही इमारतींचे विस्तारीकरण सुरू आहे, असे कल्पतरू सहकारी गृहनिर्माण संस्थेचे रहिवासी कपिल कुलकर्णी म्हणाले. या संस्थेने आधीच डोंगरावरून दोन वेळा भूस्खलन पाहिले आहे.

निदर्शकांनी बेलापूर टेकड्या वाचवा, मंदिरे स्थलांतरित करा, लोकांचे जीवन महत्त्वाचे आहे, पर्यावरण वाचवा, डोंगर उतारावरील मंदिरे सर्वांना धोक्यात आणतात, आमचे हिरवेगार संरक्षण करा, जंगलतोड थांबवा अशा संदेशांसह फलक आणि बॅनर हातात घेतले होते.

स्वयंरोजगार असलेल्या व्यावसायिक महिला अमृता कर्णावत म्हणाल्या, "आम्ही धार्मिक वास्तूंच्या विरोधात नाही, परंतु त्या सुरक्षित ठिकाणी असायला हव्यात." गेल्या काही वर्षांत, डोंगरांवरील बरीचशी हिरवळ नष्ट झाली आहे आणि अनेक तक्रारी असूनही कोणताही अधिकारी कारवाई करत नाही, असा त्यांनी खेद व्यक्त केला.

आरटीआय कार्यकर्ते सुधीर दाणी यांनी सिडको व्यवस्थापन न्यायालये आणि मंत्रालयाच्या आदेशांचीही पर्वा करत नाही याबद्दल धक्कादायक बाब व्यक्त केली.

न्यायालयीन निकालांचे उल्लंघन करणाऱ्या सरकारी संस्थांविरुद्ध अवमान याचिका दाखल करण्याचा इशारा नॅटकनेक्टने दिल्याने नगरविकास विभागाने अलीकडेच सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक आणि नवी मुंबई महापालिका आयुक्तांना मानवाधिकार आयोगाच्या आदेशाची आठवण करून दिली आहे.

### आम्हाला इर्शाळवाडीसारखी आपत्ती येण्याची भीती आहे - स्थानिक

"आम्हाला इर्शाळवाडीसारखी आपत्ती येण्याची भीती आहे. शेकडो भाविक मोकळ्या मातीवर बांधलेल्या या प्रार्थनास्थळांकडे येतात," असे स्थानिक कार्यकर्ते हिमांशू काटकर म्हणाले. काही प्रार्थनास्थळांमध्ये १,५०० हून अधिक लोक सामावून घेऊ शकतात असे हॉल आहेत आणि देव न करो, जर भूस्खलन झाले तर मोठा बिकट प्रसंग ओढावेल," असे ते म्हणाले. जुलै २०२३ मध्ये मुंबईजवळील डोंगर उतारावरील संपूर्ण इर्शाळवाडी गाव भूस्खलनात नष्ट झाले आणि ८४ जणांचा मृत्यू झाला.


# पालघरमध्ये अडीच कोटींचे ड्रग्ज जप्त

## रसायनशास्त्राच्या द्विपदवीधर आरोपीला अटक

**पालघर :** महाराष्ट्रात एमडी ड्रग्ज बनवण्याचे अनेक उद्योग उघडकीस आले असून, त्यातून हजारो कोटी रुपयांची उलाढाल होत असते. पोलिसांनी गेल्या वर्षभरात सुमारे पाच हजार कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त केले आहेत. त्यातच आता पालघर पोलिसांनी दोन कोटी ४२ लाख रुपयांचे ड्रग्ज जप्त केले असून याप्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे.

गेल्या काही वर्षापासून राज्यातील युवक अमली पदार्थाच्या आहारी जात आहेत. गुजरातमधून सुरुवातीला मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ महाराष्ट्रात येत होते. आता महाराष्ट्रातच एमडी ड्रग्जचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होत असून गेल्या वर्षी पुणे जिल्ह्यात दौंड तालुक्यात ड्रग निर्मितीचा मोठा कारखानाच उघडकीस आला होता. त्यानंतर सोलापूर आणि नाशिकशीही एमडी ड्रग्जचे कनेक्शन आढळून आले होते.

### घरातच घातक पदार्थाची निर्मिती



आज बोईसर पोलिसांनी मोठी कारवाई केली. या छाप्यात दोन कोटी बेचाळीस लाख रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात आले आहेत. आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे स्वतःच्या घरातच एमडी ड्रग्जचे उत्पादन करत होता. पोलिसांच्या माहितीनुसार आरोपी हा रसायनशास्त्रात द्विपदवीधर असून त्याने घातक पदार्थाची निर्मिती आपल्या घरातच सुरु केली आहे. पोलिसांनी घटनास्थळावरून एमडी ड्रग्ज व अन्य साहित्य जप्त केले आहे.



### पालघर, बोईसर भागात लोण

ठाणे, पालघर आणि गुजरातचे ड्रग्जबाबतीत कनेक्शन आढळले असून वारंवार ड्रग्ज निर्मितीचे प्रकल्प उद्ध्वस्त केले जात असले, तरी महाराष्ट्रातील तस्करी आणि विक्री मात्र थांबायला तयार नाही. गेल्या दोन दिवसांपूर्वीच सांगलीमध्ये ३० कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात आले होते, तर यापूर्वी सांगली जिल्ह्यात दोनशे कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर पालघर पोलीस सतर्क झाले आहेत. अमली पदार्थांचा विळखा आता ग्रामीण भागालाही पडू लागला आहे. वसई व नालासोपारा शहरात अनेक निग्रो वंशाच्या लोकांकडून पोलिसांनी अमली पदार्थ जप्त केले असतानाच आता हे लोण पालघर आणि बोईसर भागातही पसरत चालले आहे.

### एका युवकाला अटक

पोलिसांनी आमान नई मुराद (२९, रा. वसई, जिल्हा पालघर) याला मानवी प्रतिबंधित मेफेड्रोन नावाची पिवळसर रंगाची पावडर व अन्य साहित्य असा मिळून २ कोटी ४२ लाख ७ हजार २०२ रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. पालघरचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक प्रदीप पाटील तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक व्हटकर या प्रकरणाचा तपास करत आहेत. यापूर्वी महाराष्ट्रात एमडी ड्रग्ज जप्त करण्यात आले आहे. गुजरात - महाराष्ट्रातील ड्रग्ज तस्करांशी बोईसरच्या तरुणाचे काही संबंध आहेत का, याचा पोलिस आता शोध घेत आहेत.

### भिवंडीचे गुजरातशी कनेक्शन

गेल्या सहा महिन्यांपूर्वी भिवंडीतून ८०० कोटी रुपयांचे द्रवरूप एमडी ड्रग्ज गुजरातच्या दहशतवादीविरोधी पथकाने जप्त केले होते. भिवंडी-वाडा मार्गावर एमडी ड्रग्ज उत्पादन युनिटवर छापा टाकून ते जप्त करण्यात आले होते. त्याचवेळी गुजरातमधील भरूच जिल्ह्यातील एका फार्मा कंपनीवरही 'एटीएस'ने धाड टाकून ३१ कोटी रुपयांचे द्रवरूप रामाडोल जप्त करण्यात आले होते.

# निफाड नगरपंचायत, निफाड मार्फत मा. उच्च न्यायालय PIL 155 अंतर्गत शासनाच्या निर्देशानुसार अनाधिकृत बॅनर्स हटवण्याची मोहीम

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**


**निफाड -** मा. उच्च न्यायालय PIL 155 अंतर्गत शासनाच्या निर्देशानुसार निफाड नगरपंचायत निफाड मार्फत शहरातील अनाधिकृत जाहिराती, होर्डिंग, फ्लेक्स, बॅनर ,पोस्टर व आकाश चिन्हे इत्यादी बाबत दिनांक 26/1/2025 ते 26/02/2025 या कालावधीमध्ये विशेष मोहीम अंतर्गत कार्यवाही सुरू आहे. त्यानुसार आज शहरातील विविध ठिकाणातील बॅनर काढण्यात आले व संबंधितावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. अमोल चौधरी, मुख्याधिकारी निफाड नगरपंचायत यांनी शहरातील




नागरिकांना परवानगी घेऊन QR कोड सह जाहिराती, होर्डिंग ,फ्लेक्स, बॅनर, पोस्टर व आकाश चिन्हे इत्यादी लावणे बाबत आव्हान केले असे न झाल्यास संबंधितांवर कडक कारवाईचा इशारा मुख्याधिकारी यांनी दिलेला आहे. आज विशेष मोहिमेअंतर्गत केलेल्या कारवाई करिता नोडल अधिकारी गुलाबराव नवले, कर प्रशासकीय अधिकारी शरद बोडके, लेखापरीक्षक जयसिंग ठाकरे, कर लिपिक अनिल कुंदे, शरद काकुळते, रतन खालकर, नंदलाल भोसले, सुनिल गांगुर्डे, हर्षल धारराव, व इतर नगरपंचायत कर्मचारी यांनी या मोहिमेत सहभाग घेतला.

# शिक्षण प्रसारक मंडळ घाटंजी अध्यक्ष श्री. सदरुद्दीनभाई गिलानी यांचे निधन..!

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेंन्दोर**



घाटंजी तालुक्यातील एक प्रसिद्ध व्यक्तीमत्व शिक्षण प्रसारक मंडळ घाटंजी चे अध्यक्ष सदरुद्दीनभाई गिलानी यांचे वृध्दापकाळाने वयाच्या ८७ व्या वर्षी आज रोज मंगळ वार ला दुपारी ४ वाजता च्या दरम्यान यवतमाळ येथे आपल्या राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्या निधनाने तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे...!

# भोकर येथील विस्तारित न्यायालयीन इमारतीचा उद्घाटन सोहळा संपन्न माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण खा.रविंद्र वसंतराव चव्हाण

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड -**:भोकर येथील विस्तारित न्यायालयीन इमारतीचा उद्घाटन सोहळा न्यायमूर्ती श्री. नितीन भ. सूर्यवंशी, उच्च न्यायालय मुंबई यांच्या हस्ते पार पडला याप्रसंगी विशेष निमंत्रित मा.मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण साहेब व नांदेड जिल्ह्याचे खासदार रविंद्र वसंतराव चव्हाण साहेब, न्यायमूर्ती श्री. शैलेश प्र. ब्रम्हे, उच्च न्यायालय मुंबई तसेच अध्यक्ष म्हणून श्रीमती सुरेखा कोसमकर, प्रमुख जिल्हा न्यायाधीश,नांदेड प्रमुख उपस्थित म्हणून युनूस मो. हनीफ खरादी, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ भोकर , श्री. संदीप भिमराव कुंभेकर अध्यक्ष , अधिवक्ता संघ भोकर उपस्थित होते

याप्रसंगी गोविंद बाबा गौड, तालुका अध्यक्ष कॉंग्रेस कमिटी भोकर तौसिफ इनामदार, शहर अध्यक्ष कॉंग्रेस कमिटी भोकर जिल्हा भरातून आलेले सर्व वकील बांधव व भगिनी तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते



# पिस्तूल बाळगणाऱ्या सराईत आरोपींच्या वारजे माळवाडी पोलिसांनी आवळल्या मुसक्या, पिस्तूल व 2 जिवंत काडतुसे हस्तगत, गुन्हे शाखेची कामगिरी,

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे पुणे**



देशी बनावटीचे पिस्तूल बाळगणाऱ्या सराईत गुन्हेगारांला वारजे माळवाडी पोलिसांनी कर्वेनगर भागातून आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत त्याच्याकडून देशी बनावटीचे पिस्तूल दोन जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आली आहेत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे गणेश शाखा विनोद तीनशे पोलीस निरीक्षक रंगराव पवार पोलीस निरीक्षक निलेश बडाख त्यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे कुणाल सचिन घावरे (वय 28 ) रा. बोराटे कॉलनी कर्वेनगर) असे आरोपींचे नाव आहे, कर्वेनगर तसेच वारजे माळवाडी भागात गुन्हे शाखा युनिट टीमचे पथक गस्त घालत होते, तेव्हा कर्वेनगरमधील डीपी रस्त्यावर घावरे थांबला होता, त्याच्याकडे एक देशी बनावटीचे पिस्तूल असल्याची माहिती पोलीस कर्मचारी प्रतीक मोरे यांना मिळाली होती, या माहितीची खातरमजा केली नंतर पोलीस पथकांने या भागात सापळा लावून सराईत आरोपी कुणाला घावरेच्या मुसक्या आवळल्या आहेत तर झडतीत त्याच्याकडून पिस्तूल आणि दोन जिवंत काडतुसे असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला, आरोपी घावरे याच्यावर बेकायदा शस्त्र बाळगल्याप्रकरणी वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, सदरची कामगिरी पोलीस उपायुक्त संभाजी कदम सहाय्यक पोलीस आयुक्त गणेश इंगळे भाऊसाहेब पठारे यांच्या सूचनेनुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे व पोलीस निरीक्षक रंगराव पवार पुणे पोलीस निरीक्षक निलेश बडाख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संजय नरळे पोलीस अंमलदार विनोद भांडवलकर विनोद जाधव गणेश सुतार हरीश गायकवाड प्रतीक मोरे आदीं पोलिसांनी या कारवाईत सहभाग घेतला,

# श्री.छत्रपती हायस्कुल भवानीनगर येथे बोर्ड परीक्षा सुरळीत सुरु

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**




इंदापूर तालुक्यातील भवानीनगर येथे मंगळवार दिनांक ११/२/२०२५ पासून इयत्ता १२ वी बोर्ड परीक्षा फेब्रुवारी /मार्च २०२५ श्री छत्रपती हायस्कुल भवानीनगर केंद्र क्रमांक ०१६६ वरती सुरळित पणे सुरु झाली.या परीक्षेसाठी या केंद्रावर एकुण 586 विद्यार्थी परीक्षा देत आहेत.यामध्ये विज्ञान शाखा 264 वाणिज्य शाखा 119 तर कला शाखा 203 विद्यार्थी नोंदणी झालेली आहे. शासनाच्या १०० कलमी कार्यक्रमाअंतर्गत १००% कॉपी मुक्त अभियानाची अंमलबजावणी केलेली आहे.या केंद्रावरती केंद्रसंचालक म्हणून श्री इनामदार एस जे मुख्याध्यापक न्यू इंगलीश स्कूल वाकी चोपडज हे काम पाहत आहेत तर याच शाळेचे जगदाळे डी.पी हे उपकेंद्रसंचालक म्हणून काम पाहत आहेत.ही परीक्षा सुरळीत व भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी शासनाच्या सर्व सुचनांचे पालन केल्याची माहीती छत्रपती जुनिअर कॉलेजचे प्राचार्य श्री रमेश मचाले यांनी दिली.कायदा व सुव्यवस्था राखणेसाठी भवानीनगर येथील पुलिस कर्मचारी व कारखान्यांचा सुरक्षा विभाग यांचे सहकार्य लाभत आहे.परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी दिपक निंबाळकर,वैभव काटे,विष्णू पवार,भीमराव पानसरे,दिलीप शिंदे यांच्यासह सर्व शिक्षक व इतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. सर्व विद्यार्थ्यांना योग्य सुचना देऊन त्यांचे स्वागत उपस्थितांच्या हस्ते गुलाबपुष्य देऊन स्वागत करण्यात आले.यावेळी इलेक्ट्रोमीक मिडीया व वृत्तपत्र यांचे प्रतिनिधी उपस्थित होते सर्वांचे केंद्राच्या वतीने हार्दिक आभार.

# धर्माबाद मध्ये खाद्यपदार्थाची उघड्यावर विक्री ! आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर !

## अन्न पुरवठा विभाग आणि नगरपालिका प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी :**
**गिरमाजी सुर्यकार**

धर्माबाद च्या बाजारात निकृष्ट दर्जाच्या, अप्रमाणित खाद्यपदार्थांची विक्री मोठ्या प्रमाणात केली जात आहे. उघड्यावर तळून, भाजून, जुनाट, घाणेरड्या वेष्टनात पॅकिंग करून खाद्यपदार्थांची विक्री केली जाते. पापडी, शेव, भजी, जिलेबी, वडे, पापडीची उघड्यावर विक्री होते. हे चित्र आठवडा बाजारात दिसते. पदार्थ तयार करण्यासाठी वापरले जाणारे साहित्य प्रमाणित नसते. त्यामुळे ग्रामीण व शहरी भागातील ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे. धर्माबाद चे बाजार हे देवाण-घेवाणीचे व खरेदी-विक्रीचे प्रमुख ठिकाण आहे. तालुक्याच्या मध्यवर्ती ठिकाणी लोकसंख्येने मोठ्या असलेल्या ठिकाणी आठवडा बाजार भरतो. अनेक गावांचा बाजार वेगवेगळ्या दिवशी भरतो. आठवडा बाजारामध्ये उघड्यावर तयार करून खाद्यपदार्थांची विक्री करणाऱ्या व्यावसायिकांची संख्या मोठी आहे. वडा, कांदाभजी शेव, पापडी तळण्यासाठी वापरलेले



तेल, तसेच पीठ, मसाल्याचे पदार्थ, तिखट आदी साहित्य कोणत्या दर्जाचे आहे, याची माहिती सर्वसामान्य ग्राहकाला नसते. तळण्यासाठी तेल डबल फिल्टर केलेले, आयएसओ प्रमाणित कंपनीचे वापरले जात नाही. भेसळयुक्त कमी दर्जाच्या सूर्यफूल तेलाचा वापर केला जातो. परिणामी असे तळलेले पदार्थ खाऊन घसा व पोटाचे त्रास सुरू होतात. त्याचा आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. असे तेलकट पदार्थ खाल्ल्याने लहान मुलांना पोटदुखी, डोकेदुखी, सर्दी, खोकला, आम्लपित्त, हगवण यासारख्या आजारांचा प्रादुर्भाव जाणवतो. तसेच जिलेबी तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या कृत्रिम रंगामुळे कॅन्सर होण्याचा धोका जास्त संभावतो. बाजारात वडा, कांदाभजी, शेव, जिलेबी, पापडी हे खाद्यपदार्थ उघड्यावर तळले जातात. पदार्थ तयार करताना धूळ, कचरा, माती पडतेच. त्याची उघड्यावरच साठवणूक केली जाते. त्यावर माशा बसतात. त्यामुळे संसर्गजन्य आजारांचा प्रादुर्भाव होतो. वास्तविक गोरगरीब, शेतमजूर लोकच या वस्तूंचे ग्राहक असतात. तसेच ग्रामीण व शहरी भागातील मुला मुलींचा आवडीचा पदार्थ




म्हणजे पाणीपुरी हे पाणीपुरीचे ठेले तर उघड्या नालीवर आपले व्यवसाय करीत आहेत नालीचा घाण वास व मळलेल्या हाताने पाणी पुरी देऊन जनतेचे आरोग्य धोक्यात घालत आहे. ग्रामीण भागात लहान मुलांमध्ये चिवडा खाद्यपदार्थ अतिशय लोकप्रिय आहे. मक्यापासून तयार केलेला हा पदार्थ सर्वच दुकानात मिळतो. त्यावर उत्पादक कंपनीचे नाव असते. परंतु बाजारात मळकट वेस्टनात पॅकिंग केलेले आणि कोणत्याही उत्पादक कंपनीचे नाव अथवा इतर माहिती नसणारे हे पदार्थ सर्रास बेकायदा विकले जात आहेत. परराज्यातून येऊन स्थायिक झालेले लोक पापडी, बटर, पाव,आदी खाद्यपदार्थ तयार करतात. प्लॅस्टिक पिशव्यांमध्ये पॅकिंग करून त्याची प्लॅस्टिक पिशव्यांमध्ये पॅकिंग करून त्यांची विक्री करतात. काही उत्पादक वाळूवर पापड भाजून विक्री करतात.एक पाकीट दहा रुपयांना विकले जाते. वास्तविक खाद्यपदार्थांना अन्न आणि औषध प्रशासनाची मान्यता असणे गरजेचे आहे. पण बाजारात कोणताही खाद्यपदार्थ लेबलशिवाय सहज आणि अतिशय कमी दरात उपलब्ध होतो.

# संरक्षण भिंतीचे पुर्ण बांधकाम अभिनेते अतुल अग्निहोत्री करणार

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

रायगड जिल्हा परिषद मराठी शाळा शिवणसई आंबे संरक्षण भिंतीचे पुर्ण बांधकाम दानशूर अभिनेता अतुल अग्निहोत्री मुंबई यांच्या सहकार्याने (स्वखर्चाने) करायचे आहे असे त्यांनी स्वतः आश्वासन देऊन त्या कामाची पाहणी व उद्घघान शनिवार ८ फेब्रुवारी रोजी सकाळी ९:३० वाजता ग्रामस्थांच्या उपस्थितीत केले. यावेळी अभिनेते अतुल अग्निहोत्री मुंबई व त्यांचे सहकारी आणि ग्रूप ग्रामपंचायतीचे दुंदरेचे विद्यमान कर्तव्यदक्ष, सरपंच सुभाषशेठ भोपी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी प्रमुख पाहुणे दुंदरे गावचे विजय यशवंत पाटील ग्रूप ग्रामपंचायत दुंदरेचे सदस्य तथा पनवेल तालुका मनसे उपाध्यक्ष विश्वास पाटील, ग्रूप ग्रामपंचायत दुंदरेचे माजी सरपंच विठ्ठल पाटील गावचे पो.पाटील व माजी सदस्य अशोक पाटील तसेच अग्निहोत्री यांचे असिस्टंट



आशिष पाल यांची प्रमूख उपस्थिती लाभली. ग्रूप ग्रामपंचायतीचे दुंदरेचे सरपंच सुभाष भोपी यांनी दानशूर अभिनेते अतुल अग्निहोत्री मुंबई यांचा सन्मान केला तसेच ग्रूप ग्रामपंचायत ऑफीस मध्ये सुध्दा आपले स्वागत करण्यात येईल असे शब्द दिले. शाळेच्या मुख्याध्यापिका प्रतिभा नायकडे आणि शिक्षिका सुवर्णा कांबळे अंगणवाडी सेविका शालिनी पालकर आणि ब्युईंग ह्युमनच्या शिक्षीका सुवर्णा पाटील व गावातली तरुण मंडळी मध्ये विजय पाटील, हरीचंद्र पाटील, काळूराम पाटील, अजय पाटील, जनार्दन भोपी, रोशन भोपी, रविंद्र तांबोळी, जयवंत पाटील इत्यादी आणि शालेय कमिटी अध्यक्ष उज्वला पाटील, चित्रा पालांडे, कोमल पाटील, प्रगती पाटील, अपर्णा पाटील, गिता पाटील, काजल पाटील, मनीषा पाटील , आर्या भोपी, करुणा तांबोळी इत्यादी महीला मंडळ मोठया संख्येने उपस्थित होते.

रायगड जिल्हा परिषद मराठी शाळा शिवणसई आंबेच्या शिक्षिका व शाळेय समिती कमिटीने कार्यक्रमाला उपस्थित पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच ग्रामस्थांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे शाल व श्रीफळ देऊन आभार मानले.